# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थपित राज्य विद्यापीठ)

*(आस्थापना विभाग)*

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२१६५९२

क्र. गो.वि/आस्था/2196/२०१५ दि. : 31 /१०/२०१५

## परिपत्रक

**संदर्भ** :–१.शासन परिपत्रक क्रं.बैठक–२४१३/प्रक्र(१४०/१५)समन्वय,दि०९/१०/२०१५.
२.शासन पत्र क्रं./उशिसं/२०१५/वाचन प्रेरणा/मवि–१/१००८३.
दि. ०९/१०/२०१५.
३.शासन पत्र क्रं.बैठक–२४१३/प्र.क्र.१४०/१५समन्वय, दि. १२/१०/२०१५.

संलग्नीत सर्व महाविदयालयांना सुचित करण्यात येते की, डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोंबर हा जन्मदिन "वाचन प्रेरणा दिवस" शासन परिपत्रक क्रं. २ अन्वये साजरा करण्याबाबत कळविलेले आहे.

संदर्भिय शासन परिपत्रक क्रं. १ नुसार वाचन प्रेरणा वृध्दीगत होण्यासाठी विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांनी सोबत संलग्नीत केलेल्या परिपत्रकानुसार उपक्रंमाचे आयोजन करुन कार्यवाही घेण्यात यावी. तसेच संदर्भिय शासन पत्र क्रं.३ नुसार बैठकिच्या इतिवृत्ताची प्रत संलग्नीत केलेली आहे. शासन पत्रानुसार घेतलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास सादर करण्यात यावे. करिता उचित कार्यवाहीस्तव सादर.

**सहपत्रः–**
१.शासनाचे संदर्भिय पत्र क्रं. १ ते ३.

(डॉ.विनायक इरपाते)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६११११५३


क्र.उशिसं/२०१५/वाचन प्रेरणा /मवि-१ / १००८३ दिनांक-०९/१०/२०१५

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे

विषय :- डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा दि.१५ ऑक्टोबर हा जन्मदिन, " वाचन प्रेरणा दिवस " म्हणून साजरा करण्याबाबत.

संदर्भ :- शासन परिपत्रक क्र. बैठक- २४१३ / प्र.क्र. (१४० / १५) /समन्वय, दि.०९.१०.२०१५

उपरोक्त संदर्भिय शासन परिपत्रकाचे अवलोकन व्हावे. ( संदर्भिय परिपत्रकाची प्रत संलग्न ) डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या अनुषंगाने त्यांचा दि.१५ ऑक्टोबर हा जन्मदिन " वाचन प्रेरणा दिवस " म्हणून साजरा करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये व समाजाच्या इतर घटकांना वाचनाची आवड व प्रेरणा निर्माण व्हावी व वाचनाचे महत्त्व जाणून घेण्यासाठी दि.१५ ऑक्टोबर हा " वाचन प्रेरणा दिवस" म्हणून खालील उपक्रम घेवून साजरा करण्याच्या सुचना शासनाने दिलेल्या आहेत.

१ ) राज्यातील उच्च शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील १४ अकृषी विद्यापीठांमध्ये डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या **The Wings of Fire , Ignited Minds, Indomitable India, India 2020** या व इतर पुस्तकांच्या वाचनाच्या अनुषंगाने चर्चासत्रे , वकृत्व स्पर्धा, परिसंवाद इ. कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

२) विद्यापीठांनी काही निवडक महाविद्यालयांची निवड करुन या दिवसाच्या निमित्ताने स्वतंत्रपणे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.यामध्ये महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी किती पुस्तके , किती कालावधीत वाचावीत याबाबतचा आराखडा महाविद्यालयांनी ठरवावा व वाचन उपक्रम राबवावेत यामध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग असेल अशा पद्धतीने कार्यक्रमांची आखणी करावी.



Received on dt. 15/10/15
सौ. पत्याके
21/10/15

उपरोक्त शासन परिपत्रकात दिलेल्या सूचनेनुसार आपल्या विद्यापीठांत सदर परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच आपल्या अधिनस्त सर्व महाविद्यालयांना दि.१५ ऑक्टोबर हा दिवस " वाचन प्रेरणा दिवस" उपरोक्त परिपत्रकात दिलेल्या सूचनेनुसार साजरा करण्याच्या सूचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

प्रशासन अधिकारी,
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य , पुणे- १

प्रत-

१) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) उचित कार्यवाहीस्तव- प्राचार्य, सर्व महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा दि.१५ ऑक्टोबर हा जन्मदिन, " वाचन प्रेरणा दिवस " म्हणून साजरा करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**शासन परिपत्रक क्रमांकः बैठक -२४१३/(प्र.क्र.१४०/१५)/समन्वय**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ०९ ऑक्टोबर, २०१५.

शासन परिपत्रक -

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या अनुषंगाने त्यांचा दि.१५ ऑक्टोबर हा जन्मदिन, " वाचन प्रेरणा दिवस " म्हणून साजरा करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये व समाजाच्या इतर घटकांना वाचनाची आवड व प्रेरणा निर्माण होणे व वाचनाचे महत्व जाणून घेण्यासाठी दि.१५ ऑक्टोबर, २०१५ हा " वाचन प्रेरणा दिवस " म्हणून साजरा करण्यात यावा याकरीता या विभागाच्या अधिपत्याखालील अकृषी विद्यापीठांनी खालील उपक्रमांचे आयोजन करावे.

१ उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील १४ अकृषी विद्यापीठांमध्ये डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या १) The Wings of Fire, २) Ignited Mind, ३) Indomitable India ४) India २०२० या व इतर पुस्तकांच्या वाचनाच्या अनुषंगाने चर्चासत्रे, वकृत्व स्पर्धा, परिसंवाद इत्यादि कार्यक्रम आयोजित करावेत.

२ विद्यापीठांकडून काही निवडक महाविद्यालयांची निवड करुन त्यांना वाचन प्रेरणा दिवसाच्या अनुषंगाने स्वतंत्रपणे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी सूचना देण्यात याव्यात.

२. तसेच वाचन प्रेरणा वृद्धींगत होण्यासाठी या विभागाच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांनी खालील उपक्रमांचे आयोजन करावे.

१ महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी किमान किती पुस्तके, किती कालावधीत वाचावीत याबाबतचा कृती आराखडा महाविद्यालयांनी ठरवावा व त्यानुसार वाचन उपक्रम राबवावा.

२ महाविद्यालयांनी स्वतंत्ररित्या वाचन /प्रबोधन कार्यक्रम आयोजित करावे.

३ महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा अधिकाधिक उत्स्फूर्त सहभाग असेल अशा पद्धतीने कार्यक्रमाची आखणी करण्यात यावी.

३. त्याचप्रमाणे समाजाच्या इतर घटकांना वाचनाची आवड व प्रेरणा निर्माण होण्यासाठी

कृ.मा.प.

९/१०

ग्रंथालयांचा सहभाग असावा म्हणून संचालक ( ग्रंथालय ) यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१ सार्वजनिक ग्रंथालये लोकांच्या मदतीने बळकट करण्यात यावीत. यासंदर्भात वर्षनिहाय उद्दिष्ट ठरविण्यात यावीत.

२ ग्रंथालयातील वाचन संस्कृती वाढीसाठी संचालक ( ग्रंथालय ) यांनी या दिवशी विशेष कार्यक्रम आयोजित करावेत.

३ या दिवशी राज्यातील सर्व ( सुमारे १२००० ) शासकीय ग्रंथालयांमध्ये खुले ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात यावे.

४. वाचन प्रेरणा दिवस यशस्वी होण्याकरीता प्रत्येक व्यक्तीचे योगदान महत्वाचे आहे. यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

१ WhatsApp, Internet, Facebook, Twitter या माध्यमातून वाचन प्रेरणा मिळेल अशा सूचना प्रसारित करण्यात याव्यात.

२ विविध क्षेत्रातील सुप्रसिद्ध व्यक्ती ( सेलिब्रिटीज ) ज्यांचा वाचक म्हणूनही लौकिक आहे, त्यांचे सहकार्य घेऊन, आयोजित कार्यक्रम यशस्वी करण्यात यावेत.

३ व्याख्यान, भाषण, चर्चासत्र, सामूहिक वाचन, अभिवाचन, वाचन अनुभव कथन, ग्रंथ प्रदर्शन, विविध स्पर्धा इत्यादींपैकी सुयोग्य उपक्रम राबविण्यात यावेत.

४ विद्यार्थी, शिक्षक, सर्व सामान्य वाचक याव्यतिरिक्त मित्र, कुटुंबातील सदस्य यांनी एकमेंकाना किमान एक पुस्तक भेट म्हणून द्यावे.

५ महाविद्यालयातील ग्रंथालयांना प्रत्येकाने किमान एक वाचनीय /प्रसिद्ध पुस्तक भेट द्यावे.

५. वाचन प्रेरणा दिवसाच्या निमित्ताने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे लेखन व विचार महत्वाचे आहेतच त्याचबरोबर एकूण वाचन संस्कृती व वाचन प्रेरणा वाढीस लागणे याकरीता दि.१५ ऑक्टोबर हा दिवस " वाचन प्रेरणा दिवस " म्हणून नियोजनबद्धरितीने साजरा करण्यात यावा.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१५१००९१६२६१७९४०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

का.रा.पिळणकर
८-१०-१५

का.रा.पिळणकर
( कार्यासन अधिकारी )

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

C:\Users\reena nakhawa\Desktop\वाचन प्रेरणा परिपत्रक.docx

महाराष्ट्र शासन

क्र.बैठक-२४१३/प्र.क्र.१४०/१५/समन्वय
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १२ ऑक्टोबर, २०१५.

प्रति,

१. प्रधान सचिव ,शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव ,मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे

4737 29/10/15

विषय :- डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस दि.१५ ऑक्टोबर हा
“ वाचन प्रेरणा दिवस ” म्हणून साजरा करण्याबाबत.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या अनुषंगाने त्यांचा जन्मदिवस दि.१५ ऑक्टोबर हा “ वाचन प्रेरणा दिवस ” म्हणून साजरा करण्याच्या अनुषंगाने मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांच्या अध्यक्षतेखाली दि.३०/०९/२०१५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात आली आहे.

(का.रा.पिळणकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र :- वरीलप्रमाणे

D:\Note Meeting\Meeting Note.docx

मा. मंत्री ( शालेय शिक्षण आणि क्रीडा, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य ), अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली, " वाचन प्रेरणा दिवस " या विषयावर दिनांक-३०.०९.२०१५ रोजी दु.१२.३० वा.

**झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या अनुषंगाने त्यांचा दि.१५ ऑक्टोबर हा जन्मदिन, " वाचन प्रेरणा दिवस " म्हणून साजरा करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये व समाजाच्या इतर घटकांना वाचनाची आवड व प्रेरणा निर्माण होणे व वाचनाचे महत्व जाणून घेणे यासाठी कार्यक्रम आयोजित करणे यासाठी मा.मंत्री महोदय उच्च व तंत्र शिक्षण यांचे दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य बैठकीस उपस्थित होते. :-

१. मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण )
२. प्रधान सचिव ( शालेय शिक्षण विभाग )
३. सचिव ( मराठी भाषा विभाग )

२. विभागाच्या वतीने खालील अधिकारी उपस्थित होते. :-
१. श्री.सिद्धार्थ खरात, उप सचिव ( विद्यापीठ शिक्षण तथा समन्वय ),
२. श्रीमती का. रा. पिळणकर, कक्ष अधिकारी ( समन्वय )
याशिवाय इतर उपस्थितांची यादी सोबत जोडली आहे.

३. प्रथमत: डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस " वाचन प्रेरणा दिवस " म्हणून साजरा करण्यासाठी शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग व मराठी भाषा विभागाने आयोजित करावयाचे काही कार्यक्रम निश्चित करणे आवश्यक असल्याबाबत मा. मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांनी सूचित केले.

४. शाळा-महाविद्यालयांमध्ये वाचन कट्टे सुरु करुन, विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळी पुस्तके उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याचेही सूचित करण्यात आले. यासंदर्भात १००० शाळांमध्ये प्रत्येकी एक याप्रमाणे १००० साहित्यिकांशी चर्चा झाल्यास एक वेगळे वातावरण तयार होऊन, वाचनाचे उद्दिष्ट साध्य होईल असे मत मांडले. दि.१५ ऑक्टोबर रोजी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्याबद्दल वृत्तपत्रांमधून विविध स्वरुपाचे लेख, माहिती आली पाहिजे. याबरोबरच यादिवशी आयोजित करावयाच्या इतर कार्यक्रमासंदर्भात चर्चेदरम्यान मा. मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत पुढीलप्रमाणे निदेश दिले आहेत. :-

| अ.क्र. | विषय | मा.मंत्री महोदयांनी दिलेले निदेश | संबंधित विभागाने करावयाची कार्यवाही. |
|---|---|---|---|
| १. | शालेय /महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या | यासंदर्भात किमान किती पुस्तके, किती कालावधीत वाचावीत हे निश्चित करण्यात यावे. विद्यार्थी, | शालेय शिक्षण विभाग / उच्च व तंत्र शिक्षण |

| | | | |
|---|---|---|---|
| | विद्यार्थ्यांनी किमान पुस्तके वाचणे. | शिक्षक, सर्व सामान्य वाचक याव्यतिरिक्त मित्र, कुटुंबातील सदस्य इत्यादिनी एकमेंकाना किमान एक पुस्तक भेट म्हणून द्यावे. | विभाग /मराठी भाषा विभाग |
| २ | डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे पुस्तक भेट देणे. | शाळा/महाविद्यालयातील ग्रंथालयांना प्रत्येकाने एखादे वाचनीय, प्रसिद्ध किमान एक पुस्तक भेट देऊन, वाचन व वाचनाची प्रेरणा हे हेतु साध्य करावेत. | शालेय शिक्षण विभाग / उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| ३. | ग्रंथालय असणे. | शाळांमधील ग्रंथालयात किमान पाचशे पुस्तके असणे आवश्यक आहे. सार्वजनिक ग्रंथालये लोकांच्या मदतीने बळकट करण्यात यावीत. यासंदर्भात वर्षनिहाय उद्दिष्ट ठरविण्यात यावीत. | शालेय शिक्षण विभाग / उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| ४. | पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त वाचन करणे. | वाचन तथा वाचनाची प्रेरणा मिळण्यासाठी तथा व्यक्तिमत्व विकासासाठी पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त वाचन होणे महत्वाचे आहे. | शालेय शिक्षण विभाग |
| ५. | शासकीय कर्मचाऱ्यांसाठी वाचनासाठी वेळ देणे. | दि.१५ ऑक्टोबर रोजी शासकीय कामकाजाच्या वेळेमध्ये अर्धा तास वाचनासाठी देण्यात यावा. याबाबत मराठी भाषा विभागाकडून संबंधितांना सूचना देण्यात याव्यात. | मराठी भाषा विभाग |
| ६. | शाळांमध्ये वाचनासाठी राखीव वेळ देण्याबाबत. | शाळांमध्ये दर आठवडयात अभ्यासाव्यतिरिक्त एक तास वाचनासाठी उपलब्ध करुन देण्यात यावा. | शालेय शिक्षण विभाग |
| ७. | वाचन कट्टा असणे. | शाळांमध्ये २०-२५ पुस्तकांची पेटी ठेऊन, दिवसभर वाचनासाठी वेळ देण्याबाबतचा उपक्रम किमान ६०००शाळांमध्ये लेखक / साहित्यिकांचा सहभाग असावा. लेखक /साहित्यिकांना बोलावण्याची कार्यवाही मराठी भाषा विभागाने करावी. | शालेय शिक्षण विभाग / मराठी भाषा विभाग |
| ८. | विद्यापीठांमध्ये परिसंवाद आयोजित करणे. | उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील १४ अकृषी विद्यापीठांमध्ये डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम 1) The Wings of Fire, 2) Ignited Mind, 3) Indomitable India and 4) India 2020 इत्यादि पुस्तकांसह त्यांच्या इतर पुस्तकांच्या वाचनाच्या अनुषंगाने चर्चासत्रे, वकृत्व स्पर्धा, परिसंवाद इत्यादि कार्यक्रम आयोजित करावेत. ( केवळ डॉ. कलाम यांच्या पुस्तकांवर नव्हे, तर कोणत्याही अनुषंगिक विषयावर चर्चासत्र /परिसंवाद व्हावेत. ) | उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| ९. | वाचनाचे कार्यक्रम आयोजित करणे. | उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांनी स्वतंत्ररित्या वाचन /प्रबोधन कार्यक्रम आयोजित करावे. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| १०. | उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विद्यापीठांनी महाविद्यालयांना सूचना | उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विद्यापीठांकडून काही निवडक महाविद्यालयांची निवड करुन त्यांना वाचन प्रेरणा दिवसाच्या अनुषंगाने स्वतंत्रपणे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी सांगण्यात यावे. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| | देण्याबाबत. | | |
| ११. | ग्रंथालयात वाचन करणे. | ग्रंथालयातील वाचन संस्कृती वाढीसाठी या दिवशी विशेष कार्यक्रम आयोजित करावे. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| १२. | सामाजिक माध्यमांचा वापर करणेबाबत. | WhatsApp, Internet, Facebook, Twitter या माध्यमातून वाचन प्रेरणा मिळेल अशा सूचना प्रसारित करण्यात याव्यात. | शालेय शिक्षण विभाग / उच्च व तंत्र शिक्षण विभाग / मराठी भाषा विभाग. |
| १३. | विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाबाबत. | महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा अधिकाधिक उत्स्फूर्त सहभाग असावा. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| १४. | व्याख्यान, भाषण इत्यादी उपक्रम हाती घेण्याबाबत. | व्याख्यान, भाषण, चर्चासत्र, सामूहिक वाचन, अभिवाचन, वाचन अनुभव कथन, ग्रंथ प्रदर्शन, विविध स्पर्धा इत्यादींपैकी सुयोग्य उपक्रम व्हावेत. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| १५. | शासकीय ग्रंथालयांमध्ये ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्याबाबत. | या दिवशी राज्यातील सर्व ( सुमारे १२००० ) शासकीय ग्रंथालयांमध्ये खुले ग्रंथ प्रदर्शन आयोजित करावे. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग |
| १६. | सुप्रसिद्ध व्यक्तींचे सहकार्य घेण्याबाबत. | विविध क्षेत्रातील सुप्रसिद्ध व्यक्ती ( सेलिब्रिटीज ) ज्यांचा वाचक म्हणूनही लौकिक आहे, त्यांचे सहकार्य घेऊन, कार्यक्रम यशस्वी करण्यात यावेत. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग |

******

मा. मंत्री ( शालेय शिक्षण आणि क्रीडा, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य ), अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली दिनांक-३०.०९.२०१५ रोजी, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा दि.१५ ऑक्टोबर हा जन्मदिन, " वाचन प्रेरणा दिवस " म्हणून साजरा करण्याच्या अनुषंगाने संपन्न झालेल्या बैठकीत उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांची यादी. :-

| अ.क्र. | उपस्थित अधिकाऱ्याचे नांव |
|---|---|
| १ | डॉ. एस. पी. बडगुजर, प्रबंधक, एस. एन. डी. टी., मुंबई. |
| २ | श्री. गिरीश पतके, राज्य मराठी विकास संस्था. |
| ३ | श्री. आनन्द काटीकर, राज्य मराठी विकास संस्था. |
| ४ | श्री. डॉ. सुवर्णा सि. खरात, उप सचिव, शालेय शिक्षण विभाग. |
| ५ | श्री. किरण गंगाधर धांडोरे, संचालक ( ग्रंथालय ), मुंबई. |
| ६ | श्री. माळवे हिरालाल, सहा. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण म.मुक्त विद्यापीठ नाशिक. |
| ७ | डॉ. सुशीलकुमार भास्कर चौधरी, सहसंचालक ( संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा प्रतिनिधी ). |
| ८ | श्री. प्रदीप कोळी, उप कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. |
| ९ | श्री. विकास पाटील, उप कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. |
| १० | जाधव भिमसिंग बारकु, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव. |
| ११ | श्रीम. सुवर्णा पवार, सचिव, महाराष्ट्र राज्य, म. वि. नि. मंडळ. |
| १२ | श्रीम. मीनाक्षी राजेंद्र पाटील, म. रा. सा. स. मंडळ. |
| १३ | डॉ. मंजूषा कुलकर्णी, संचालक, भाषा संचालनालय. |
| १४ | श्रीम. वृषाली सावंत, अवर सचिव, मराठी भाषा विभाग. |
| १५ | श्रीम. वर्षा जोशी, कक्ष अधिकारी, मराठी भाषा विभाग. |
| १६ | श्रीम. वर्षा आधंळे, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय. |
| १७ | डॉ. पुरुषोत्तम भापकर, आयुक्त, शिक्षण. |

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा दि.१५ ऑक्टोबर हा जन्मदिन, " वाचन प्रेरणा दिवस " म्हणून साजरा करण्याबाबत.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कार्यालय
आवक क्र. 7366 दि. 28/10/15
जावक क्र.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः बैठक -२४१३/(प्र.क्र.१४०/१५)/समन्वय
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ०९ ऑक्टोबर, २०१५.

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आवक क्र. 4734 दि. 29/10/15
जावक क्र. ........ दि. ........

शासन परिपत्रक -

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या अनुषंगाने त्यांचा दि.१५ ऑक्टोबर हा जन्मदिन, " वाचन प्रेरणा दिवस " म्हणून साजरा करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये व समाजाच्या इतर घटकांना वाचनाची आवड व प्रेरणा निर्माण होणे व वाचनाचे महत्व जाणून घेण्यासाठी दि.१५ ऑक्टोबर, २०१५ हा " वाचन प्रेरणा दिवस " म्हणून साजरा करण्यात यावा याकरीता या विभागाच्या अधिपत्याखालील अकृषी विद्यापीठांनी खालील उपक्रमांचे आयोजन करावे.

१ उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील १४ अकृषी विद्यापीठांमध्ये डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या १) The Wings of Fire, २) Ignited Mind, ३) Indomitable India ४) India २०२० या व इतर पुस्तकांच्या वाचनाच्या अनुषंगाने चर्चासत्रे, वकृत्व स्पर्धा, परिसंवाद इत्यादि कार्यक्रम आयोजित करावेत.

२ विद्यापीठांकडून काही निवडक महाविद्यालयांची निवड करुन त्यांना वाचन प्रेरणा दिवसाच्या अनुषंगाने स्वतंत्रपणे कार्यक्रम आयोजित करण्यासाठी सूचना देण्यात याव्यात.

२. तसेच वाचन प्रेरणा वृद्धींगत होण्यासाठी या विभागाच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांनी खालील उपक्रमांचे आयोजन करावे.

१ महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी किमान किती पुस्तके, किती कालावधीत वाचावीत याबाबतचा कृती आराखडा महाविद्यालयांनी ठरवावा व त्यानुसार वाचन उपक्रम राबवावा.

२ महाविद्यालयांनी स्वतंत्ररित्या वाचन /प्रबोधन कार्यक्रम आयोजित करावे.

३ महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा अधिकाधिक उत्स्फूर्त सहभाग असेल अशा पद्धतीने कार्यक्रमाची आखणी करण्यात यावी.

३. त्याचप्रमाणे समाजाच्या इतर घटकांना वाचनाची आवड व प्रेरणा निर्माण होण्यासाठी

कृ.मा.प.

ग्रंथालयांचा सहभाग असावा म्हणून संचालक ( ग्रंथालय ) यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१ सार्वजनिक ग्रंथालये लोकांच्या मदतीने बळकट करण्यात यावीत. यासंदर्भात वर्षनिहाय उद्दिष्ट ठरविण्यात यावीत.

२ ग्रंथालयातील वाचन संस्कृती वाढीसाठी संचालक ( ग्रंथालय ) यांनी या दिवशी विशेष कार्यक्रम आयोजित करावेत.

३ या दिवशी राज्यातील सर्व ( सुमारे १२००० ) शासकीय ग्रंथालयांमध्ये खुले ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात यावे.

४. वाचन प्रेरणा दिवस यशस्वी होण्याकरीता प्रत्येक व्यक्तीचे योगदान महत्वाचे आहे. यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

१ WhatsApp, Internet, Facebook, Twitter या माध्यमातून वाचन प्रेरणा मिळेल अशा सूचना प्रसारित करण्यात याव्यात.

२ विविध क्षेत्रातील सुप्रसिद्ध व्यक्ती ( सेलिब्रिटीज ) ज्यांचा वाचक म्हणूनही लौकिक आहे, त्यांचे सहकार्य घेऊन, आयोजित कार्यक्रम यशस्वी करण्यात यावेत.

३ व्याख्यान, भाषण, चर्चासत्र, सामूहिक वाचन, अभिवाचन, वाचन अनुभव कथन, ग्रंथ प्रदर्शन, विविध स्पर्धा इत्यादींपैकी सुयोग्य उपक्रम राबविण्यात यावेत.

४ विद्यार्थी, शिक्षक, सर्व सामान्य वाचक याव्यतिरिक्त मित्र, कुटुंबातील सदस्य यांनी एकमेंकाना किमान एक पुस्तक भेट म्हणून द्यावे.

५ महाविद्यालयातील ग्रंथालयांना प्रत्येकाने किमान एक वाचनीय /प्रसिद्ध पुस्तक भेट द्यावे.

५. वाचन प्रेरणा दिवसाच्या निमित्ताने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे लेखन व विचार महत्वाचे आहेतच त्याचबरोबर एकूण वाचन संस्कृती व वाचन प्रेरणा वाढीस लागणे याकरीता दि.१५ ऑक्टोबर हा दिवस " वाचन प्रेरणा दिवस " म्हणून नियोजनबद्धरितीने साजरा करण्यात यावा.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१५१००९१६२६१७९४०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

का.रा.पिळणकर
८-१०-१५

का.रा.पिळणकर
( कार्यासन अधिकारी )

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
७. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
१२. निवडनस्ती.